महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ

# बैठकीचे ईतिवृत्त

## महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पनचक्की, औरंगाबाद.

| | |
|---|---|
| दि. १८ नोव्हेंबर २०१८<br>वेळ सकाळी ११. ३० वाजता | ठिकाणः- इस्लाम जिमखाना, मरीन लाईन , मुंबई |

दि. १८ नोव्हेंबर २०१८ रोजी सकाळी ११.३० वाजता इस्लाम जिमखाना, मरीन लाईन, मुंबई येथे महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाची बैठक मा. एम. एम. शेख . कार्य-अध्यक्ष, यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. त्यात खालील प्रमाणे मा. सदस्य उपस्थित होते. सदरच्या सभेत खालील विषयावर विचार विनिमय करुन निर्णय घेण्यात आले.

| | |
|---|---|
| १) मा. जनाब एम. एम. शेख साहेब | कार्य-अध्यक्ष |
| २) मा. जनाब हुसैन दलवाई साहेब, | सदस्य |
| ३) मा. जनाब मौलाना जहीर अब्बास रिजवी साहेब, | सदस्य |
| ४) मा. जनाब आसिफ शौकत कुरेशी साहेब, | सदस्य |
| ५) मा. जनाब खालीद बाबु कुरेशी साहेब, | सदस्य |
| ६) मा. जनाब इम्तियाज मुश्ताक काजी साहेब, | सदस्य |
| ७) मा. जनाब एस. टी. तडवी साहेब | सदस्य सचिव तथा |

मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद

**विषय क्रं. १.** **महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळावर मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर नियमित नियुक्ती करण्यासाठी सुयोग्य उमेदवारांचा नावाची शिफारस करण्या बाबत.**

टिपण

महाराष्ट्र शासन अल्पसंख्यांक विकास विभाग, शासन निर्णय क्रं. वक्फ २०१८ /प्र.क्र. ८१ /का-४ मंत्रालय मुंबई ३२ दि. १७/१०/२०१८ अन्वये वक्फ अधिनियम १९९५ चे कलम २३ अन्वये तसेच महाराष्ट्र वक्फ नियम २००३ च्या नियम ७ अन्वये विहित करण्यात आलेल्या नियमानुसार महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळावर मुख्य कार्यकारी अधिकारी पदा करिता नियमित नियुक्ती करण्यासाठी दोन सुयोग्य अधिका-यांच्या नावाची शिफारस करण्यासाठी

वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ९७ अन्वये वक्फ मंडळास शासना कडुन निर्देश देण्यात आलेले होते.

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळावर पुर्ण वेळ मुख्य कार्यकारी अधिकारी पदासाठी कक्ष अधिकारी अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांचे पत्र क्र. वक्फ.२०१८/प्र.क्र.४१/क-४ दि. ३/२/२०१८ अन्वये जनाब साजीद खान पठाण, उप सचिव, वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, यांनी इच्छुकता दर्शवली असल्याचे सामान्य प्रशासन विभागाकडून कळविल्या प्रमाणे त्यांनी संबंधितांची वैयक्तीक माहिती व १० वर्षाच्या कालावधी पासून आता पर्यंत धारण करीत असलेल्या पदांचा तपशिल व वर्ष २०११-१२ ते २०१५-१६ चे गोपनिय अहवाल इत्यादी आवश्यक कार्यवाहीस्तव पाठविले आहे.

ठराव क्रं. १

**यावर सविस्तर चर्चा होऊन चर्चे अंती , वक्फ अधिनियम १९९५ चे कलम २३ अन्वये तसेच महाराष्ट्र वक्फ नियम २००३ च्या नियम ७ अन्वये विहित करण्यात आलेल्या नियमानुसार महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळावर मुख्य कार्यकारी अधिकारी पदा करिता नियमित नियुक्ती करण्यासाठी खालील दोन शासकीय अधिका-यांची शिफारस करण्यात येत आहे.**

| अ. क्रं. | शासकीय अधिका-यांचे नांव | सद्या कार्यरत असलेले पद | शासकीय विभागाचे नांव व ठिकाण |
|---|---|---|---|
| १. | जनाब साजीद खान पठाण | उप-सचिव, बैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई | बैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई |
| २. | जनाब एजाज हाशमी | अप्पर मुख्य कार्यकारी अधिकारी , | जिल्हा परिषद , गोंदीया |

**ठराव सर्वानुमते मंजूर**